संदर्भ : १- मा. उच्च न्यायालय, मुंबई गोपनीय पत्र क्रमांक बी-(जन) ५६०१/५७/२०२४/१६४९, दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४.

२- जिल्हा न्यायालय, परभणी यांनी दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द केलेली शिपाई या पदाची निवड यादी.

# जिल्हा न्यायालय, परभणी.

## कार्यालयीन आदेश क्रमांक ( ३२५ )

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी ह्या खालील प्रमाणे नवीन नेमणुकीचे आदेश निर्गमित करीत आहेत. **सदर आदेश हे तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.**

| अ. क्रं. | उमेदवाराचे नांव | नवीन पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री. धोंडोपंत ज्ञानोबा चाटे, रा. गौळवाडी पो. राणीसावरगांव ता. गंगाखेड जि. परभणी (शिपाई या पदासाठी निवड झालेला उमेदवार क्र.१.) | **शिपाई** या पदावर तात्पुरत्या स्वरूपात दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पुर्णा यांच्या आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पुर्णा यांच्या न्यायालयात रिक्त असलेल्या पदी नवीन नेमणुक. |
| २ | श्री. अमरनाथ अन्सीराम सोडगीर, रा. डोंगरगांव (शे.) पो. डोंगरपिंपळा ता. गंगाखेड जि. परभणी (शिपाई या पदासाठी निवड झालेला उमेदवार क्र.२.) | **शिपाई** या पदावर तात्पुरत्या स्वरूपात दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, सेलु यांच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या पदी नवीन नेमणुक. |

**टीप :**

१- सदर नेमणुक ही तात्पुरत्या स्वरुपात शिपाई म्हणून एस-१, रू. १५०००-४७६०० या वेतन संरचनतील वेतनामध्ये करण्यात येत आहे. उमेदवारास असे सुचित करण्यात येते की, त्यांना दिलेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आली असून, त्यांना कोणतेही कारण व नोटीस न देता केव्हाही सेवेतून कमी करण्यात येईल.

२- उमेदवारास असेही सुचित करण्यात येते की, त्यांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत कामावर हजर रहावे. जर नेमणुक दिलेल्या न्यायालयात ते ३० दिवसाच्या आत हजर झाले नाही तर त्यांना दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येवून त्यांचे नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल.

३- उमेदवारास त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांना एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल किंवा एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

४- उमेदवारांने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होताना स्वत:चा मुळ फोटो असलेले ओळखपत्र ( वाहन परवाना/निवडणुक ओळखपत्र/पॅनकार्ड/बॅक पासबुक/पासपोर्ट) या पैकी कोणत्याही एका दस्ताची मुळ व साक्षांकित प्रत सोबत आणावी. तसेच त्यांचे स्वत:चे अलीकडील छायाचित्र व

शैक्षणीक अर्हतेबाबत मुळ कागदपत्र व त्याच्या छायांकीत प्रती नियुक्तीच्या वेळी संबंधीत कार्यालयास सादर करावे.

५- उमेदवारांस महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१-१०-२००५ नुसार " नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना " लागू राहील.

(उज्वला म. नंदेश्वर),
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.

जावक क्र./आस्था/ब-४/ 9547 /२०२४.
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी.
दिनांक :- १२ सप्टेंबर, २०२४.
प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

१- दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गंगाखेड यांना देवून कळविण्यात येते की, सदर नेमणुक आदेश हे विशेष बेलीफामार्फत संबंधितावर बजावणी करुन तामीली अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२- प्रबंधक, जिल्हा न्यायालय, परभणी.

३- स्वीय सहायक, जिल्हा न्यायालय, परभणी.

४- अधीक्षक (आस्थापना / न्यायदान विभाग), जिल्हा न्यायालय, परभणी.

५- सहायक अधीक्षक (वित्त /अभिलेख विभाग), जिल्हा न्यायालय, परभणी.

६- संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदर नेमणुक आदेश हे जिल्हा न्यायालय, परभणीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

७- श्री. धोंडोपंत ज्ञानोबा चाटे, रा. गौळवाडी पो. राणीसावरगांव ता. गंगाखेड जि. परभणी
**मार्फत: दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गंगाखेड.**

८- श्री. अमरनाथ अन्सीराम सोडगीर, रा. डोंगरगांव (शे.) पो. डोंगरपिंपळा ता. गंगाखेड जि. परभणी

**मार्फत: दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गंगाखेड.**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.